# कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन

## कंत्राटासाठी नामवंत कंपन्यांमध्ये स्पर्धा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्प बाधितांचे गिरगाव येथे पुनर्वसन करण्यात येणार असून, त्यांच्यासाठी बांधण्यात येणाऱ्या भव्य इमारतीच्या उभारणीचे कंत्राट मिळविण्यासाठी जेएमसी, टाटा, एल ॲण्ड टी, शापूरजी पालनजी या कंपन्यांमध्ये चढाओढ सुरू आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशद्वारे (एमएमआरसी) मेट्रो-३ प्रकल्पाची उभारणी करण्यात येत असून या प्रकल्पाचे बहुतांश काम मार्गी लागले आहे. मेट्रो-३च्या मार्गातील काळबादेवी-गिरगाव भागातील १७ उपकरप्राप्त इमारतींसह २१ इमारतींमधील विस्थापितांचे याच भागात पुनर्वसन करण्यात येणार आहे. हे पुनर्वसन करताना सध्या ज्यांचे घर २०२ चौरस फुटांचे आहे त्यांना ४०५ चौरस फूट, २०२ ते ३०० चौरस फुटांचे घर असणाऱ्यांना ६०० चौरस फूट, ४४४ चौरस फुटांपर्यंतचे घर असणाऱ्यांना क्षेत्रफळाच्या ३५ टक्के अधिक क्षेत्रफळाचे घर देण्यात येणार आहे. व्यापारी गाळ्यांना सध्याच्या क्षेत्रफळाच्या २० टक्के अधिक जागा दिली जाणार आहे. त्यासाठी गिरगाव येथे ४८ मजली इमारत बांधण्यात येणार आहे.

या इमारतीमध्ये कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्पामुळे बाधित झालेले रहिवासी, व्यावसायिक व कार्यालयांचे पुनर्वसन केले जाणार आहे. ही इमारत बांधण्यासाठी एमएमआरसीने काढलेल्या निविदेला चांगला प्रतिसाद मिळाला असून बांधकाम उद्योगातील नामवंत कंपन्या हे काम मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या कामाच्या पूर्व अर्हतेसाठी अर्ज दाखल केलेल्या कंपन्यांमध्ये जेएमसी प्रोजेक्ट (इंडिया), टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेड, एल ॲण्ड टी लिमिटेड, वास्कॉन इंजिनीयरिंग लिमिटेड, शापूरजी पालोनजी ॲण्ड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, मोंटोकारलो लिमिटेड, कॅपसाइट इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड, न्याती इंजिनीअर्स ॲण्ड कन्सल्टंट प्रायव्हेट लिमिटेड, मॅन इन्फ्रा कन्स्ट्रक्शन लिमिटेड व नाथानी पारेख कन्स्ट्रक्शन लिमिटेड आदींचा समावेश आहे.

निवडलेल्या कंपन्यांद्वारे निविदा मागविण्यात येतील. गिरगाव पुनर्विकास इमारतीमध्ये ४७३ रहिवासी सदनिका, १३७ व्यावसायिक आस्थापना व १९ व्यावसायिक कार्यालयांचा समावेश असेल.

### सुविधा काय?

या ४८ मजली इमारतीचे तीन तळ मजले सेवा तसेच पार्किंगसाठी राखीव असतील व ग्राउंड लेव्हल, एक ते सात मजले अंशतः व्यावसायिक गाळे व सेवा देण्यासाठी राखीव असतील. आठ ते नऊ मजले व्यावसायिक गाळे, सेवा तसेच सुविधांसाठी राखीव असतील. १० ते १८ मजल्यांवर व्यावसायिक गाळे तसेच सदनिका असतील व १९ ते ४८ मजल्यांवर रहिवासी सदनिका असतील. या इमारतीस कार पार्किंगची सुविधा तसेच बगीचा आदी सुविधा राहतील. एकूण ४८ मजल्यांपैकी ३९ मजले रहिवासी सदनिकांसाठी राखीव असतील अशी माहिती मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी दिली.